# जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे

दिनांक: २४/०९/२०२४.

## निविदा सुचना

जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे अधिपत्याखालील कल्याण, वसई, पालघर, भिवंडी, उल्हासनगर, बेलापूर, डहाणू, जव्हार, शहापूर, वाडा, कल्याण रेल्वे, विरार रेल्वे, मुरबाड येथील न्यायालयात कार्यान्वित असलेले कॅनॉन १५१ डी डब्लु व क्योसेरा २०४० डी एन या प्रिंटरसाठी एका वर्षाच्या कालावधीसाठी वार्षिक देखभाल व दुरुस्ती करार करणेकामी स्थानिक सेवा पुरवठादारांकडून निविदा / दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

तरी इच्छुक सेवा पुरवठादारांनी प्रपत्र - १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दिनांक ०३/१०/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांचे नावे निम्नलिखित पत्त्यावर बंद लखोट्यात निविदा/दरपत्रके सादर करावयात.

पत्ता - जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे
कोर्टनाका, ठाणे प. ४२१३०१

सदरबाबत अधिक माहिती घेणेसाठी सहायक अधिक्षक, रोख व वित्त विभाग, जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे यांचेकडे कामाच्या दिवशी सकाळी १०.३० ते सायंकाळी ०५.०० या कार्यालयीन वेळेत संपर्क करावा.

दिनांक ०३/१०/२०२४ रोजी सायंकाळ ०५.०० वाजल्यानंतर प्राप्त झालेल्या निविदा / दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. तसेच निविदा स्विकृत करण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार सर्वस्वी मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांना राहील.

हुकूमावरुन,

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
ठाणे.

ठाणे.
दिनांक : २४/०९/२०२४.

# प्रपत्र - १

| कॅनॉन १५१ डी डब्लू प्रिंटर / क्युसेरा २०४० डी एन प्रिंटर | |
|---|---|
| वार्षिक सेवाशुल्क एकूण २०८ प्रिंटरसाठी (एकत्रित) | |

प्रिंटरचे दुरुस्ती तसेच सुटे भाग किंमत प्रती नग

| कॅनॉन १५१ डी डब्लू प्रिंटर सुटे भाग / दुरुस्ती किंमत | किंमत प्रति नग |
|---|---|
| *Cartridge Arm For Canon 151dw* | |
| Pickup Roller and Rubber | |
| ROLLER HOLDER ASSEMBLY | |
| Fuser Exit Roller | |
| Drum, pressure roller, Teflon | |
| Seperation pad Assembly | |
| Drive Aseembly Gear Set | |
| Fuser Aseembly parts | |
| Sensors replacement | |
| Logic card reparing | |
| **क्योसेरा २०४० डी एन प्रिंटर सुटे भाग/ दुरुस्ती किंमत** | **किंमत प्रति नग** |
| Paper Pickup roller | |
| Kyocera 2040 Control Panel And Board – DP Unit | |
| Exsiting Fuser Unit reparing including parts | |
| Developer Unit reparing including parts | |
| Drum Unit reparing including parts | |
| Paper Tray Unit spare parts | |
| Fuser Gear assembly gear set + grease | |
| Sensors replacement | |
| Logic card reparing | |

# अटी व शर्ती

१. निविदाकारांना संबंधीत कामाचा अनुभव असणे बंधनकारक असून प्रिंटरची दुरुस्ती करण्यासाठी ज्या कर्मचा-यांची नेमणूक करण्यात येईल त्यांची नावे देणे बंधनकारक असेल.

२. ज्या निविदाकारांची निविदा स्विकृत करण्यात येईल, त्यांना सदर कामाचे आदेश मिळाल्यापासून १० दिवसांचे आत सेवा करार करणे बंधनकारक राहील.

३. निविदाकारांनी निविदा सादर करतांना प्रपत्र - १ सोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

   अ. कंपनी / संस्थेचे नोंदणीची छायांकित प्रत
   ब. मागील ३ वर्षाचे आयकर विवरणपत्रे
   क. कंपनी अथवा संस्था प्रमुखाचे पॅनकॉर्डची साक्षांकित प्रत
   ड. जी. एस. टी. कर नोंदणी प्रमाणपत्र
   इ. आस्थापना व दुकाने अधिनियमानुसार नोंदणी केलेल्या परवान्याची प्रत
   ई. अनुभव प्रमाणपत्र किंवा तत्सम कागदपत्रे
   फ. निविदेतील अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे हमीपत्र
   ग. कंपनी / संस्थेचे बचत अथवा चालू बँक खातेचे कागदपत्रे
   ख. निविदाकाराचे स्वतःवर कोणताही गुन्हा तसेच न्यायालयात कोणतेही प्रकरण प्रलंबित नसल्याबाबचे प्रतिज्ञापत्र.

४. निविदाकार यांना जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे व त्यांचे आधिपत्याखालील कल्याण, उल्हासनगर, मुरबाड, भिवंडी, शहापुर, वाडा, जव्हार, डहाणू पालघर, बेलापूर, वसई, कल्याण रेल्वे, विरार रेल्वे या तालुका न्यायालय व कार्यालयातील कार्यान्वित असलेल्या प्रिंटरचे दुरुस्तीकामी स्वखर्चाने सेवा उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

५. निविदाकार यांनी प्रिंटरचे दुरुस्तीबाबत नोंदणी करणेकामी त्याचा ई-मेल आयडी देणे बंधनकारक राहील.

६. तसेच दुरुस्तीबाबत निविदाकाराच्या नोंदणीकृत ईमेलवर तक्रार प्राप्त झाल्यापासून ४८ तासाचे आत सदर प्रिंटरची दुरुस्ती करणे बंधनकारक राहील.

७. निवडलेल्या निविदाकार यांनी निविदा प्रसिध्द होण्याचे दिनांकास ठाणे जिल्ह्यातील सर्व न्यायालयात प्रपत्र-१ मध्ये नमूद उपलब्ध एकूण २०८ प्रिंटरसाठी वार्षिक सेवाशुल्क तिमाही पध्दतीने एकूण चार टप्प्यात अदा करण्यात येईल.

८. प्रिंटरमधील नादुरुस्त सुटे भाग बदलणेकामी अतिरिक्त सेवाशुल्क देण्यात येणार नाही.

९. सेवा पुरवठाधारकांना प्रिंटरची दुरुस्ती संबंधीत तालुक्यातील सर्व्हर रुम मध्येच करणे बंधनकारक असेल. कोणेतेही प्रिंटर न्यायालयाबाहेर घेवून जाता येणार नाही.

१०. प्रिंटरची दुरुस्तीचे वेळी सुटे भाग बदलेले असल्यास त्याबाबतचे चलनाची एक प्रत संबंधीत न्यायालयात व एक प्रत जिल्हा न्यायालय, मुख्यालय येथे जमा करणे बंधनकारक राहील. तसेच दरमहा देयक सादर करणे बंधनकारक राहील. तसेच प्रशासकीय पूर्तता पूर्ण होवून कोषागार कार्यालय, ठाणे यांचेकडून मंजुर झालेनंतर सदरचे देयकाची रक्कम कंत्राटदारास अदा करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

११. कंत्राटदारास सदर कंत्राट कोणत्याही परिस्थितीत इतरांना हस्तांतरीत करता येणार नाही. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीस पोटभाड्याने देता येणार नाही.

१२. कंत्राटदार हे कार्यालयात काम करतांना त्यांचे नजरेस ज्या काही न्यायालयीन कामाच्या बाबी येती त्या न्यायालयीन बाबी आहेत याची जाणीव ठेवून त्याबाबत आवश्यक ती गोपनियता ठेवावी. तसेच न्यायालयीन कामकाजात कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप होणार नाही याची दक्षता घ्यावी. न्यायालयीन कामकाजात हस्तक्षेप केल्याचे आढळल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करुन कंत्राट रद्द करण्यात येईल.

१३. कंत्राटदारामार्फत नियुक्त केलेल्या कामगारांकडून शासकीय मालमत्तेचे नुकसान झाल्याचे आढळल्यास सदरची नुकसान भरपाई ही कंत्राटदारास देय असलेल्या रक्कमेतून वसूल करण्यात येईल.

१४. या कार्यालयाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचे पालन करणे कंत्राटदार यांच्यावर बंधनकारक राहील.

DISTRICT COURT जिल्हा न्यायालय ठाणे THANE

हुकूमावरुन,

ठाणे.
दिनांक : २४/०९/२०२४.

प्रबंधक,
जिल्हा व अप्पर न्यायालय,
ठाणे.